# सहाय्यक निबंधक सहकारी संस्था खालापूर, जि. रायगड याचे कार्यालय

१ ला मजला सोमेश्वर सहकारी गृह निर्माण संस्था, गणेशकृपा बिल्डींग, खालापूर,
ता. खालापूर, जि. रायगड- अलिबाग
दूरध्वनी क्रमांक: ०२१९२ २७५०२७, Email- arcs_khalapur@rediffmail.com

६१५ ते ६१२

जा.क्रं.सनिखा/वि-१/क.७७ अ/सन २०१७
दि. ३०/०३/२०१७

वाचले क्रं. १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७अ(१)(ब-१)
२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३(१) (ड) अन्वये श्री.दिलावर दस्तुरकर इतर चार समिती सदस्य यांनी सादर केलेला अविश्वास ठराव दि.१.०३.२०१७

ज्याअर्थी, अमृता सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. रिस. ता. खालापूर, जि. रायगड, नोंदणी क्रमांक आरजीडी/केएलआर/एचएसजी/(टीसी)/८२१/१९९१, दि. २०.०२.१९९१ ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९ मधील तरतुदीनुसार नोंदविण्यात आलेली आहे, आणि,

ज्याअर्थी, संस्थेचे चेअरमन यांनी संदर्भ क्रं. २ अन्वये संस्थेचे चेअरमन यांचे विरुध्द श्री.दिलावर दस्तुरकर व इतर चार समिती सदस्य यानी दिनांक १/३/२०१७ रोजी अविश्वास ठराव सादर केला होता त्यावर दिनांक १०/३/२०१७ रोजी विशेष सभा लावण्यात आली त्या सभेत संस्थेचे चेअरमन यांचे विरुध्द अविश्वास ठराव पारित झालेला नाही. परंतु या कार्यालयाचे असे निदर्शनास आणले की, संस्थेच्या संचालक मंडळातील अध्यक्ष /सचिव,मुदतसंपलीअसतानाही संस्थेचेकामकाज पहात असल्याकारणाने समितीच्या रचनेत दोष निर्माण झाला आहे. आणि,

ज्याअर्थी, संस्थेवर व्यवस्थापक समिती अस्तित्वात नसल्यामुळे संस्थेचे कामकाज ठप्प झाले आहे, त्यामुळे संस्थेची व्यवस्थापक समितीची रचना करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, वरील परिस्थिती पाहता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार संस्थेवर संस्थेच्या कारभार/व्यवस्थापन पहाणेसाठी व योग्य प्रकारे व्यवस्थापक समिती निर्वाचित करुन देण्यासाठी प्राधिकृत अधिकारी नियुक्ती बाबत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## -: आ दे श :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, बी. डी. अहिरे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था खालापूर, अमृता सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. रिस, ता. खालापूर, जि. रायगड या संस्थेचे कामकाज करणे व निवडणूकी बाबत पुढील कारवाई करणे कामी, श्री. दि. वा. सोनवणे सहकारी अधिकारी , (श्रे-२) यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून सहा महिन्याकरीता नेमणूक करण्यांत येत आहे.

प्राधिकृत अधिकारी यांनी पदभार घेतल्यानंतर संस्थेचा कामकाज अहवाल दर महिना सादर करावा

सदरचा आदेश आज दि. ३०/०३/२०१७ रोजी माझी सही शिक्क्यानिशी निर्गमित केला आहे.

ठिकाण :- खालापूर
दिनांक :- ३०/०३/२०१७

(बी. डी. अहिरे)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, खालापूर

प्रती,

१. मा. चेअरमन/ सचिव अमृता सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. रिस. ता. खालापूर, जि. रायगड